0058171

FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-1

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. मुंबई पहिली खबर क्र. FIR No. 23, वर्ष Year 2024, दिनांक Date 07/08/2024

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. अधिनियम 1988, कलमे Sections 7, 7 अ.
   (ii) अधिनियम Act ..........., कलमे Sections ...........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ........, तारीख पासून Date from 31/07/2024 वेळ Time ........, तारीख पर्यंत Date to 06/08/2024 Time 21:40
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 31/07/2024 वेळ Time 12:00
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 37/2024, तारीख Date 07/08/2024 Time 15:45

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी प्रत्यक्ष, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. 18 km. उत्तरेकडे चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. अंधेरी
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name के. पूर्व. विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका ठिकाणाचे नंबर No. if any ........, गल्ली Ward ........, रस्त्याचे नाव Name of road ........
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place आझाद रोड, गाव Village गुंदवली, पोस्ट Post अंधेरी, तालुका Taluka (पूर्व), जिल्हा Dist. मुंबई, राज्य State ........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्री. गोल्डी सुद
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name परषोत्तम सुद
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 58 वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9892211119
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. —, दिल्याचा दिनांक Date of Issue —, दिल्याचे ठिकाण Place of Issue —
   (f) व्यवसाय Occupation स्पोर्ट्स एक्सपोर्ट व रियल इस्टेट
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste पंजाबी, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address : ........, गल्ली / सर्व्हे नं. Ward ........, घर / नाव नं. House/Name No. ........, फोन / मो. नं. Phone/M. No. ........, पॅन नं. PAN No. ........, वोटर्स नं. Card No. ........
   रस्त्याचे नाव Road रूम नं. 191-192, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place शहीद भगतसिंग कॉलनी, गाव Village ........, पोस्ट Post ........, पो.स्टे. P. Stn. जे.बी. नगर,
   तालुका Taluka अंधेरी (पूर्व), जिल्हा Dist. मुंबई - 400059, राज्य State ........, सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
   ① मदार अशोक तारी, वय 42 वर्षे, पदनिर्देशित अधिकारी, के पूर्व विभाग, BMC अंधेरी (पू) मुंबई रा.ठि. रु.नं. 19, B-1, चौथा मजला, नारायण पुजारी नगर, वरळी सी फेस मुंबई-18
   ② मो. शहाजादा मो. यासीन शहा, वय 33 वर्षे (खाजगी इसम) प्रॉपर्टी इस्टेट एजंट. रा.ठि. 11/12/2 ...... नोगोली ...... नं.-400000 मो.क्र. 976967...

फिर्यादी श्री गोल्डी परषोत्तम सुद यांची फिर्याद स्वतंत्र कागदावर टंकलिखीत केली असून तीच प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात यावी.

समक्ष

[signature]

गणेश हिरासिंग विंगुवाले
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

[signature]

Goldie Parshotam Sud

फिर्याद दिनांक – ०६/०८/२०२४ ते
०७/०८/२०२४

श्री गोल्डी परषोत्तम सूद, वय ५८ वर्षे, धंदा–व्यवसाय, रा.ठि प्लॉट नं–१९१, १९२ शहीद भगतसिंग कॉलनी, जे. बी. नगर, मुंबई–४०००५८ मो.क्र. ९८९२२११११९

.......•........

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्यावर माझ्या कुटुंबियांसमवेत राहावयास आहे. मी रियल इस्टेट व इम्पोर्ट–एक्सपोर्टचे काम करतो. त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह चालतो.

प्लॉट नं. १९१,१९२, शहीद भगतसिंग कॉलनी, जे.बी.नगर, मुंबई ४०००५८ या टिकाणी माझी ४ मजली इमारत आहे. तसेच सदर ठिकाणी असलेल्या मोकळया जागेत कंपाऊंडच्या आत प्रदर्शन व विक्रीचे तसेच रियल इस्टेटचे व्यवसाय चालू आहे. सदर प्लॉटच्या लगत प्लॉट नं. १९३,१९४ असून सदर प्लॉट मी खरेदी करीत आहे. माझे नावे असलेल्या प्लॉट नं. १९१,१९२, शहीद भगतसिंग कॉलनी, जे.बी.नगर, मुंबई ४०००५९ या टिकाणीची ४ मजली इमारत पैकी वरील दोन मजले अवैध्य असल्याचे सांगून बीएमसी ने दि. १०/१/२०२४ रोजी मला नोटीस बजावली होती. सदर नोटीसीला मी दि. १४/१/२०२४ रोजी उत्तर दिले होते. त्यांनतर मला दि. ०५/२/२०२४ रोजीची माझे बांधकाम निष्कासन करण्यात येणार असलेबाबतचे आदेश मला प्राप्त झाले नसताना दिनांक २२/०२/२०२४ रोजी पार्ट डिमोलीशन केले. मी दि. २२/२/२०२४ रोजी वरील दोन्ही आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र. स्टॅप ८७०९/२०२४ दि. १३/०३/२०२३ रोजी दाखल केली होती. सदर याचिकेत दि. २१/०३/२०२४ रोजी सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाने बीएमसीच्या दि. ०५/०२/२०२४ रोजीचे आदेश रद्दबातल ठरविले. त्यांनतर बीएमसी यांनी दि. २४/०६/२०२४ रोजी सदरचे इमारत व स्ट्रक्चर अवैध्य असल्याचे परत आदेश काढले होते. त्याविरुध्द मी मा. हायकोर्ट मुंबई येथे दि. १२/०७/२०२४ याचीका क्र. स्टॅप २१५५४/२०२४ दाखल केली होती. दि. १६/०७/२०२४ रोजी मा. उच्च न्यायालयाने दि. २४/०६/२०२४ रोजीच्या दोन्ही आदेशाला स्थगिती दिली. त्यानंतर दि. २२/०७/२०२४ रोजी के ईस्ट वार्डचे लोकसेवक श्री गोविंद शेळके, कनिष्ठ अभियंता यांनी माझ्या इमारतीची पहाणी केली व निष्कासन करण्याची धमकी देवून गेले. दि. २६/०७/२०२४ रोजी मी के ईस्ट वॉर्डचे लोकसेवक श्री गोविंद शेळके, कनिष्ठ अभियंता, श्री सोनावणे, कार्यकारी अभियंता, व श्री एम ए तारी, पदनिर्देशित अधिकारी (डेझिग्नेटेड ऑफिसर) यांना भेटलो असता ते तिघे एका केबीनमध्ये बसलेले होते. त्यांनी त्यावेळी माझे प्लॉट नं. १९१, १९२ चे बांधकामासंदर्भात मदत करण्यासाठी रु. ५० लाख व माझे इमारती शेजारील असलेले नियोजित प्लॉट नं. १९३, १९४ चे संदर्भात मदत करण्यासाठी दिड कोटी रुपये असे एकूण दोन कोटी रकमेची मागणी केली होती. त्यानंतर दि. २६/०७/२०२४ रोजी प्लॉट नं. १९१, १९२ चे बांधकामास तसेच प्लॉट नं. १९३, १९४ च्या बांधकामास बीएमसी अधिकारी श्री शेळके व श्री. सोनावणे...यांनी भेट देवून स्थळाची पहाणी केली. व मला सोमवारी किंवा पुढील आठवडयात कार्यालयात येवून भेटण्यास सांगितले होते.

मला के ईस्ट वॉर्डचे श्री गोविंद शेळके, कनिष्ठ अभियंता, श्री सोनावणे, कार्यकारी अभियंता, व श्री एम ए तारी, नियुक्त अधिकारी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि. ३१/०७/२०२४ रोजी ला.प्र.वि. मुंबई येथील कार्यालयात समक्ष येवून त्यांच्याविरूध्द तक्रार असून त्यांच्याविरूध्द स्वहस्ताक्षरात इंग्रजीमध्ये लेखी तक्रार अर्ज लिहून दिला.

त्याच वेळी पो.नि. गणेश पिंगुवाले यांनी माझी लेखी तक्रार घेवुन माझे तक्रार अर्जाची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येईल असे सांगुन त्वरीत दोन शासकीय पंचाना पाचारण केले. पंच हजर झाल्यानंतर पो.नि. गणेश पिंगुवाले यांनी मला सदर ठिकाणी हजर असलेले पोनि सुप्रिया नटे, दोन सरकारी पंच व पोलीस पथक यांची ओळख करून दिली. त्यानंतर पोनि गणेश पिंगुवाले यांनी त्याच्या ताब्यातील मी दिलेला तक्रार अर्ज पंचांना वाचावयास दिला. सदर तक्रार अर्जातील मजकूर वाचून त्याबाबत पंचानी तक्रारदार यांना विचारून खात्री केली. त्यानंतर पो.नि. गणेश पिंगुवाले यांच्या सुचनेवरून दोन्ही पंचांनी मी दिलेल्या तक्रार अर्जावर सह्या केल्या. पो.नि. गणेश पिंगुवाले यांनी समक्ष म्हणुन सही करून सदर तक्रार अर्ज स्वतःच्या ताब्यात घेतला. त्यानंतर पो.नि. गणेश पिंगुवाले यांनी मला सापळा कारवाई करण्यापुर्वी करावयाच्या पडताळणीची माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.

Goldie Sud

नि. गणेश पिंगुवाले हे मला व दोन सरकारी पंचाना सोबत घेवून कार्यालयातील पहील्या माळयावरील गोपनीय कक्षामध्ये घेवून गेले. सदर ठिकाणी पोह रावराणे यांच्या मदतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये माझे, पो.नि. गणेश पिंगुवाले व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले.

त्यांनतर लोकसेवक यांच्या कार्यालयात जाण्यापूर्वी ते कार्यालयात असल्याबाबतची माहिती मिळणेकरिता मी लोकसेवक यांना त्यांच्या मोबाईलवर व्हॉटसअॅप कॉलद्वारे संपर्क करावे असे ठरले व सदरचा कॉल हा ध्वनीमुद्रीत करण्यात येईल, याबाबत पोनि गणेश पिंगुवाले यांनी मला व पंचांना सुचना दिल्या. त्यानंतर पोनि गणेश पिंगुवाले यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी माझा मोबाईल क्रमांक ९८२२११११९ वरून लोकसेवक शेळके यांचा मोबाईल क्रमांक ९८२१४५८४३१ वर कॉल केला असता, त्यावेळी मी त्यांना माझे कामाबाबत काय निर्णय झाला याबाबत विचारणा केली. त्यावेळी त्यांनी मला इतर लोकसेवक अधिकारी कार्यालयात नसलेबाबत सांगितले. सदरचा कॉल डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरवर ध्वनिमुद्रीत करण्यात आला आहे. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी इतर लोकसेवक अधिकारी हे कार्यालयात उपस्थित नसल्याने सदरची पडताळणी स्थगित करीत असल्याचे मला पंचासमक्ष सांगितले व दि. ०१/०८/२०२४ रोजी पुन्हा पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले.

दिनांक ०१/०८/२०२४ रोजी मी केलेल्या माहितीचे अधिकाराचे सुनावणी कामी केपुर्व कार्यालयामध्ये जावयाचे असल्यामुळे त्याबाबत मी पोनि पिंगुवाले यांना कळविले असता त्यांनी सांगितलेप्रमाणे दिनांक ०१/०८/२०२४ रोजी पडताळणी कारवाई आयोजीत करण्यात आली. त्यानमुद ठरल्याप्रमाणे पोनि पिंगुवाले व पोलीस पथक हे चकाला जे बी नगर मेट्रो स्टेशन जवळ डॉ प्रदिप सूद यांच्या क्लिनिक समोर आले. पोनि पिंगुवाले यांनी मला व पंचाना पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या खबरदारीच्या सुचना दिल्या. त्यानंतर मी व पंच लोकसेवक यांच्या कार्यालयात जावून श्री शेळके व श्री सोनावणे यांची भेट घेतली असता, लोकसेवक सोनावणे यांनी लोकसेवक श्री तारी हे कामानिमित्त बाहेर असल्याने आजची सुनावणी उदया अकरा वाजता पुढे ढकलण्यात आल्याचे सांगून उदया दि. ०२/०८/२०२४ रोजी कार्यालयात येण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच उपरोक्त नमूद डॉ प्रदिप सूद यांच्या क्लिनिक जवळ आलो असता, पोनि पिंगुवाले यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमधील संभाषण ऐकल्यानंतर उदया दि. ०२/०८/२०२४ पडताळणी कारवाई करणार येणार असल्याचे सांगितले.

दि. ०१/०८/२०२४ रोजी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी पंच व पोलीस पथक ठरल्याप्रमाणे डॉ प्रदिप सूद यांच्या क्लिनिक समोर दि. ०२/०८/२०२४ रोजी पडताळणी कारवाईकरिता आलो. पोनि पिंगुवाले यांनी मला व पंचाना पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या खबरदारीच्या सुचना दिल्या. त्यानंतर मी व पंच, लोकसेवक यांच्या कार्यालयात जावून लोकसेवक तारी व लोकसेवक सोनावणे यांची भेट घेतली. माझी त्यांचेशी कामासंदर्भात चर्चा झाली. चर्चेदरम्यान लोकसेवक श्री तारी यांनी हाताच्या इशाऱ्याने पैशाची मागणी केली व मंगळवार दि. ०६/०८/२०२४ कार्यालयात येण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच उपरोक्त नमूद डॉ प्रदिप सूद यांच्या क्लिनिक जवळ आलो असता, पोनि पिंगुवाले व पोनि नटे यांनी पंचांसमक्ष डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमधील संभाषण ऐकल्यानंतर दि. ०६/०८/२०२४ पुन्हा पडताळणी कारवाई करणार येणार असल्याचे सांगितले.

दि. ०२/०८/२०२४ रोजी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी पंच व पोलीस पथक आवश्यक साधनसामुग्री सोबत घेवून ठरल्याप्रमाणे डॉ प्रदिप सूद यांच्या क्लिनिक समोर दि. ०६/०८/२०२४ रोजी पडताळणी कारवाईकरिता आलो. पोनि पिंगुवाले यांनी मला व पंचाना पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या खबरदारीच्या सुचना दिल्या. त्यानंतर मी व पंच, लोकसेवक यांच्या कार्यालयात माझे मालकीची ऑडी कंपनीची A4 मॉडेलची सफेद रंगाची चारचाकी वाहन क्र. MH 48 S 2716 घेवुन गेलो व लोकसेवक सोनावणे यांची भेट घेतली. नमुद भेटी दरम्यान आमची कामासंदर्भात चर्चा झाली. लोकसेवक सोनावणे यांनी लोकसेवक तारी यांची वैदयकीय तपासणी असून ते सायंकाळी येणार असल्याने लोकसेवक सोनावणे यांनी त्यांचे मोबाईल नंबर मला दिले व १६.३० वा. कार्यालयात येण्यापुर्वी त्यांना फोन करून येण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच डॉ प्रदिप सूद यांच्या क्लिनिक समोर आलो असता, पोनि पिंगुवाले यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमधील संभाषण ऐकल्यानंतर सायंकाळी पुन्हा पडताळणी कारवाई करणार येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर मी १६.३० वाजेपर्यंत लोकसेवक सोनावणे यांचे फोनची वाट पाहीली त्यांचा फोन न आल्याने मी लोकसेवक सोनावणे यांच्या मोबाईल फोनवर फोन केला असता त्यांनी तो रिसीव्ह केला नाही.

Goldie Sud

त्यानंतर मी व पंच पुन्हा लोकसेवक यांच्या कार्यालयात गेलो असता लोकसेवक सोनावणे हे कार्यालयात उपस्थित नसल्याने मी परस्पर लोकसेवक तारी यांचे केबीनजवळ त्यांना भेटण्यासाठी गेलो त्यावेळी त्यांचे केबीनमध्ये प्रवेश करत असताना लोकसेवक तारी यांनी माझ्या मागोमाग केबीनमध्ये प्रवेश करत असणारे पंच श्री बळी यांना हाताच्या इशाऱ्याने कॅबीनच्या बाहेर थांबण्यास सांगितले. त्यामुळे नमूद वेळी पंच क्र ०१ बळी हे केबिन च्या बाहेर थांबले लोकसवेक तारी माझे भेटी दरम्यान माझे प्लॉट नं. १९१,१९२,१९३,१९४ शहीद भगतसिंग कॉलनी, जे.बी.नगर, मुंबई ४०००५८ चे संदर्भात चर्चा झाली. त्याच बरोबर सदर ठिकाणी वनप्लस वन कन्सट्रक्शन करण्याकरीता व नमुद प्लॉटवर असलेले कन्सट्रक्शन याच्यावर कारवाई न करण्याकरीता काय करता येईल याबाबत चर्चा झाली. नमुद चर्चे दरम्यान लोकसेवक तारी यांनी मला **'साहब आ जायेंगे तो एक बार वापस उनको क्लिअर कर देता हु.. . how fast you can arrange ?'** असे म्हणुन त्यांनी यापुर्वी मागणी केलेली लाचेची रक्कम ते कीती लवकर तयार ठेवु शकतात याबाबत विचारणा केली. त्यावर मी त्यांना **' fifty to hundred... but क्या फायनल क्या हुआ है कितना ? दो करोड मे दोनो आयेगा की... दो का तुकडा... '** असे म्हणुन नक्की किती मागणी फायनल ठरली याबाबत विचारणा करून दोन करोड मध्ये दोनही कामे होतील का याबाबत विचारणा केली असता लोकसेवक यांनी मानेने होकार दिला. त्याचवेळी 'those were your terms and conditions... ' ' you agreed to my terms and conditions i agreed to your terms... ' असे म्हणुन मी त्यांच्या अटी पुर्ण केल्या तरच ते सहकार्य करतील असे अप्रत्यक्षरित्या सांगितले. त्यानंतर त्यांनी इतर विषयी चर्चा सुरू केली असता मी ' सर फिर मै क्या करू सर ?' अशी विचारणा केली असता लोकसेवक यांनी all talks done... come to the point असे म्हणुन मुळ मुद्दयावर येणेबाबत सुचविले. त्यानंतर झालेल्या चर्चेदरम्यान मी वलंजु साहेबांशी चर्चा झाली किंवा कसे याबाबत विचारणा केली असता त्यांनी हो म्हणुन सहमती दर्शविली. त्यानंतर लोकसेवक यांनी मला त्यांचा मोबाईल क्रमांक दिला. त्याचवेळी साहेब आलेनंतर मला कळवितो असे त्यांनी सांगितले असता मी त्यांना माझे बहिणीकडे आहे असे सांगुन सदर ठिकाणाहुन निघुन निघुन पोलीस पथक थांबलेल्या ठिकाणी पंचांसमवेत परत आलो.

त्यानंतर पो.नि.पिंगुवाले यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. व लोकसेवक यांनी अर्ध्या तासात परत बोलाविले असल्याने लगेच पो.नि. पिंगुवाले यांनी माझे शर्टाचे आतील बनियनला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून पंच श्री. बळी असे लोकसेवकाच्या कार्यालयात भेटण्यासाठी गेलो असता तारी हे त्यांच्या कॅबिन मध्ये हजर नव्हते. नमुद वेळी एक खाजगी इसम लोकसेवक यांचे केबीनबाहेर हजर होते. त्यांचेकडे विचारणा केली असता त्याने तारी साहेब हे मिटींगकरीता डीएमसी कडे गेले असल्याबाबत सांगितले. तसेच त्याचे नाव शाहजादा असे सांगुन तो साहेबांचा पर्सनल व्यक्ति असल्याचे सांगितले व मला केबीन बाहेर बसण्यास सांगितले. त्यानुसार मी व पंच असे केबीन बाहेर थांबलो. त्यानंतर काही वेळाने लोकसेवक तारी हे त्यांचे केबीनमध्ये आले असता मी त्यांचेसोबत बोलत त्यांचे केबीनमध्ये गेलो. नमुद भेटी दरम्यान लोकसेवक तारी यांनी मला माझे नमुद इमारतीचे संदर्भात बाहेरून कोणतीही कंम्प्लेंट होणार नाही याबाबत आश्वासन दिले. त्याचबरोबर त्यांचे सोसायटीचे लोकांकडुनही तक्रार यायला नाही पाहिजे असे सांगितले. नमुद भेटीदरम्यान कामाबाबत चर्चा झाली. नमुद वेळी लोकसेवक तारी यांनी मी करणार असलेल्या बांधकामाबाबत सविस्तर चर्चा केली. त्याचवेळी नमुद बांधकाम करतेवेळी पहिले शेड बांधुन मग आतमध्ये बांधकाम करण्याबाबत देखिल सुचविले. व काही अडचण आल्यास ' तुम शेड बनाके लेलो... then you can say it is monsoon shed है... बाद मे निकाल देंगे... ' असे म्हणणयाबाबतचा उपाय देखिल सांगितला. तसेच नमुद बांधकाम करताना ' अंदर तुम्हारा जो भी है बाहर फोटोग्राफ नही आना चाहिये... बस... that you will take care of... ' असे म्हणुन आतील बाजुस काहीही बांधकाम करीत असतील तरी त्याचे फोटो बाहेर आले नाही पाहिजे याबाबत काळजी घेण्यास सांगितले. त्यानंतर लोकसेवक तारी यांनी ' so should i wait or you come tomorrow ? ' असे म्हणुन त्यांनी मागणी केलेली रक्कम देणेबाबत सुचविले. त्यावेळी मी त्यांना ' बोलो बोलो जैसे... जैसे बोलो वैसा... i am ready ' असे म्हणुन ते तयार असल्याचे सांगितले. त्यावेळी त्यांनी गुडमॉर्निंग



Goldie Sud

मेसेज पाठविले नंतर त्यांचे ओळखीचा इसम नामे प्रतीक याला देणे बाबत सुचविले. त्यावेळी मी ' आज भी दे सकता हु... ' असे म्हणुन लाचेची रक्कम मी आजही देणेस तयार असल्याचे सांगितले. त्यावेळी लोकसेवक तारी यांनी ' अभ्भी है क्या... 'असे म्हणुन लाचेची रक्कम आहे का याबाबत विचारणा केली. त्यावेळी मी एक घंटा असे सांगितले असता लोकसेवक तारी यांनी '' ठिक है मै वेट करता हुं।' असे सांगुन ते वाट पाहत असल्याचे सांगितले. त्यावेळी लोकसेवक तारी यांनी **i will wait...** तब तक मै नाश्ता कर लेता हु... **will see you in the office only..** असे सांगुन ते वाट पाहत असल्याचे सांगितले. त्यावेळी मी 'अभी मेरे पास सेव्हंटी फाईव्ह लॅक्स है. .. ओके...' असे म्हणुन पंचाहत्तर लाख असल्याचे सांगितले. त्यानंतर काही कामाचे विषयी चर्चा झालेनंतर मी पुन्हा त्यांना 'ये जो दो करोड रूपया है इसमे वलंजु साहब का भी है ना इसमे... ' अशी विचारणा लोकसेवक यांना केली असता लोकसेवक तारी यांनी **सबका है** म्हणुन नमुद बाबीला संहमती दर्शविली. त्याचवेळी मी त्यांना मतलब बाद मे उनका कोई ॲक्शन नही आना चाहिये... असे म्हणुन वळंजु साहेबांकडुन त्रास नको व्हायला याकरीता विचारणा केली असता त्याबाबत देखिल लोकसेवक तारी यांनी ' नो नो अरे... बैठा हु मै... **i want... you talk...** सिर्फ इतना ही बोलो हाय हॅलो सर ' असे म्हणुन तसे काही होणार नाही याबाबत आश्वासन दिले. त्यानंतर ते माझेसोबत वॉर्ड ऑफिसर श्री वळंजु यांचे कार्यालयामध्ये भेटण्याकरीता गेले असता त्यांची श्री मनिष वळंजु यांचे सोबत भेट झाली. त्यावेळी मनिष वळंजु यांना ' अरे कमाल है सर आपका हाथ रहे हमारे सर पे वही काफी है... ' असे म्हणुन मला त्यांचे सहकार्याची अपेक्षा बोलुन दाखविली असता त्यांनी ओके म्हणुन सहमती दर्शविली.

त्यानंतर मी आणि लोकसेवक तारी साहेब केबीनच्या बाहेर आलो आणि तारी साहेबांना एक तासात येतो असे सांगितले. त्यानंतर मी व पंच डॉ प्रदिप सूद यांच्या क्लिनिक समोर आलो.

पो.नि.पिंगुवाले यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. लोकसेवक याने लाचेची रक्कम तात्काळ मागणी केली असल्याने त्वरीत सापळा कारवाई करावयाची आहे असे पो.नि. पिंगुवाले यांनी सांगितले. त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर माझेकडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रूपये ७५ लाख रूपंयांबाबत विचारणा केली असता मी त्यांना माझेकडे रूपये २,००,०००/– (भारतीय चलनाच्या रू.५०० दराच्या ४०० नोटा) रक्कम असल्याचे सांगितले. पो.नि. पिंगुवाले यांनी माझेकडे २,००,०००/– रूपये असल्याने उर्वरीत ७३,००,०००/– लाख रूपये हे खेळण्यातील नोटा लाचेच्या रक्कमेकरीता वापरत असल्याचे मला पंचासमक्ष सांगितले. त्यानंतर माझे कडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. २,००,०००/– (भारतीय चलनाच्या रू.५०० दराच्या ४०० नोटा) ताब्यात घेतल्या. त्यानंतर नमुद नोटांच्या मोबाईलवर फोटो काढून छायांकित प्रती मशिनवर काढुन घेतल्या.

पो.नि. पिंगुवाले यांनी मला व पंच क्र १ बळी यांना सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर माझे कडुन घेण्यात आलेली रक्कम रू. २,००,०००/– (भारतीय चलनाच्या रू. ५०० दराच्या ४०० नोटा) व उर्वरीत (रू.७३,००,०००/– लाख रूपये हे खेळण्यातील नोटा ) नोटांना पोनि पिंगुवाले यांचे सुचनेनुसार पोहचा मोकल यांनी ॲंथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन ॲंथ्रासीन पावडरचे व अल्ट्रावायलेट दिव्याचे गुणधर्म समजावुन सांगितले. पो.नि. पिंगुवाले यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मोबाईल फोनवर मिस कॉल अथवा कॉल करुन लाच स्विकारल्याबाबत पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले. त्यानंतर चकाला जे बी नगर मेट्रो स्टेशन जवळ डॉ प्रदिप सूद यांच्या क्लिनिकमध्ये पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस पो.हवा. मोकल यांनी ॲंथ्रासीन पावडर लावून सदरची रक्कम माझेकडे असलेल्या निळया व मोरपिशी रंगाची दोन सॅक/बॅग मधील पुढील दुसऱ्या कप्प्याची चैन उघडून त्यामध्ये अलगद ठेवले व बॅगची चैन बंद केली. त्यानंतर लाचेची रक्कम ठेवलेल्या निळया व मोरपिशी रंगाची दोन सॅक/बॅगला देखील बाहेरील बाजुने ॲंथ्रासीन पावडर लावली. लोकसेवक यांनी त्यांच्या कार्यालयात लाचेची रक्कम घेवून बोलाविली असून सदरचे कार्यालयाची कार्यालयीन वेळ समाप्त झाली असल्याने सदर ठिकाणी कार्यालयनी



Goldie Sud

स्टाफ व्यतिरिक्त इतर कोणीही नसण्याची शक्यता असल्याने सापळा कारवाईबाबत लोकसेवक यांना संशय येण्याची शक्यता असल्याने पोनि पिंगुवाले हे माझ्या कारचे खाजगी चालक म्हणून सोबत येतील असे ठरले. तसेच सापळा कारवाई दरम्यान पोनि पिंगुवाले यांना चालक राजु असे म्हणुन संबोधतील असे ठरले.

त्यानंतर पो.नि. पिंगुवाले यांनी माझे शर्टाचे आतील बनियनला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून पंच श्री. बळी व पोनि पिंगुवाले यांच्यासह के ईस्ट वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी पुर्व येथील लोकसेवक यांचे कार्यालयात माझे खाजगी वाहन ऑडी कंपनीची A4 मॉडेलची सफेद रंगाची चारचाकी वाहन क्र. MH 48 S 2716 मधून गेलो. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी कार के/ईस्ट वॉर्डीतील गेटमधून आत नवून कार्यालयासमोर थांबविले असता, मी खाली उतरलो व बाजुला थांबलेले लोकसेवक श्री तारी यांच्या जवळ गेलो असता त्यांनी त्याच्या जवळ उभा असलेल्या इसमाला सांगितले कि, 'ये शेहजाद गाडी मे बैठ और जा ना निचे... ' त्यावर शाहजादा यांनी हा असे सांगितले. त्यावर मी लोकसेवक तारी यांना बोललो ' give it to him all? ' व माझे पाठोपाठ पोलीस पथक काही अंतर ठेवून आले. त्यानंतर शाहजादा हे मला बेसमेंट येथे घेवुन आले व त्यांनी माझेकडुन लाचेची रक्कमेची मागणी केली असता मी माझे कडील अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम २,००,०००/– (रू. ५००/– दराच्या ४०० भारतीय चलनी नोटा व उर्वरीत ( उर्वरीत ७३,००,०००/– लाख रूपये हे खेळण्यातील नोटा ) असलेल्या निळया व मोरपिशी रंगाच्या दोन सॅग बॅग हे शाहजादा याच्या हातात दिल्या असता तो सदर बॅगा दोन खांद्यावर लावुन बाहेरील दिशेने जात असताना पोनि पिंगुवाले यांनी त्याला ताब्यात घेवुन लोकसेवक यांचेबाबत विचारणा करत आम्ही सर्व प्रवेशदवाराजवळ आलो असता सदर वेळी लोकसेवक तारी हे अगोदरच निघुन गेल्याची माहिती मिळाली. त्यानंतर त्यांचा शोध नमुद कार्यालयामध्ये घेतला परंतु ते मिळुन आले नाहीत. नमुद वेळी लाचेची रक्कम स्विकारणारे इसमास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे संपुर्ण नाव

श्री. मोहम्मद शाहजादा शाह, वय २२ वर्षे, धंदा – प्रॉपर्टी स्टेट एजंट, (खाजगी इसम) रा.ठि. – ११/१२/२२५, आला हजरत चाल, आनंद नगर, न्यु लिंक रोड, जोगेश्वरी (पश्चिम) मुंबई असे असल्याचे मला,पंचांना व पोलिस पथकास समजले. त्याचवेळी नमुद इसमाने लाचेची रक्कम ही त्याला त्याचा ओळखीचा मित्र प्रतीक याने घ्यावयास सांगितली असल्याचे सांगितले. त्यावेळी नमुद ठिकाणी हजर असलेल्या व संशयास्पद रित्या सदर ठिकाणी थांबलेल्या प्रतीक नावाचे इसमास पथकाने ताब्यात घेवुन त्याला त्याचे नाव व पत्ता विचारणा केली असता त्याने त्याचे नाव प्रतिक विजय पिसे वय ३५ वर्षे धंदा–'कंत्राटदार खाजगी इसम रा.ठि. रुम नं ०६, शिवकृपा हॉ सौ, रोड नं ०५, समतानगर, कांदिवली पूर्व मुंबई सांगितले. त्यानंतर त्यांना देखिल सापळा पथकाने संशयित म्हणुन ताब्यात घेतले.

त्यानंतर प्रतिक पिसे याच्या महिंद्रा कंपनीची XUV 3XD मॉडेलचे वाहन क्र. MH 47 BT 4959 या वाहनाची झडती घेतली असता त्याच्या गाडीच्या मागील डिक्कीमध्ये रोख रू.७,००,०००/– (रू. ५००/– दराच्या १४०० भारतीय चलनी नोटा) रक्कम मिळुन आली तसेच त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या काळया रंगाच्या सॅकमध्ये रू. २,६२,०००/–( रू. ५००/– दराच्या ५०४ भारतीय चलनी नोटा व रू. १००/– दराच्या १०० भारतीय चलनी नोटा ) रोख रक्कम मिळुन आली. सदरची रक्कम पंचासमक्ष जप्त करण्यात आली आहे.

तरी वरील नमुद वेळी व ठिकाणी यातील लोकसेवक नामे मंदार अशोक तारी, वय ४२ वर्षे, रा.ठी. फ्लॅट नं १९, बील्डींग बी १, चौथा मजला, नारायण पुजारी नगर, वरळी सी फेस, वरळी मुंबई यांनी माझे प्लॉट क्र १९१, १९२, शहीद भगत सिंग कॉलनी, जेबी नगर येथील इमारतीचे वरील दोन मजले अवैध असल्याबाबतची नोटीस देवुन त्यावर निष्कासन कारवाई न करणेकरीता व सदर ठिकाणी नियोजीत अनधिकृत बांधकामाबाबत मदत करणेकरीता तसेच नियोजीत प्लॉट क्र १९३, १९४ खरेदी केलेनंतर तेथे अनधिकृत बांधकामाबाबत सहकार्य करणेकरीता असे सर्व मिळुन एकुण दोन करोड रूपये लाचेची मागणी करून त्यातील पहिला हप्ता म्हणुन रू ७५,००,०००/– पंचाहत्तर लाख इतकी लाचेची रक्कम स्वतःकरीता व इतरांकरीता स्विकारण्याचे मान्य केले व सदरची रक्कम वरील नमुद खाजगी इसम आरोपी नामे श्री. मोहम्मद शाहजादा शाह, वय २२ वर्षे, धंदा – प्रॉपर्टी स्टेट एजंट, (खाजगी इसम) रा.ठि. – ११/१२/२२५, आला हजरत चाल, आनंद नगर, न्यु लिंक रोड, जोगेश्वरी



Goldie Sud

श्री गोल्डी परषोत्तम सूद, वय ५८ वर्षे यांचा दिनांक ०६/०८/२०२४ रोजीचा फिर्यादी जबाब पुढे चालु...

(पश्चिम) मुंबई व प्रतिक विजय पिसे वय ३५ वर्षे धंदा-'कंत्राटदार खाजगी इसम रा.ठि. रुम नं ०६, शिवकृपा हॉ सौ, रोड नं ०५, समतानगर, कांदिवली पूर्व मुंबई यांच्या मदतीने संगनमत करून स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी लोकसेवक श्री गोविंद शेळके, कनिष्ठ अभियंता, श्री सोनावणे, कार्यकारी अभियंता, व श्री एम ए तारी, नियुक्त अधिकारी तसेच खाजगी इसम श्री. मोहम्मद शाहजादा शाह व श्री. प्रतिक विजय पिसे यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असून, ती मला समजावून सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

(गणेश पिंगुवाले),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Goldie Sud

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ......... तात्काळ .........

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

लाचेची रक्कम रु 75,00,000/- (पंच्याहत्तर लाख) त्यामध्ये रोख रक्कम रु 2,00,000/- भारतीय चलनातील रु 500 च्या 400 नोटा व इतर रु 73,00,000/- त्यामध्ये खेळण्यातील रु. 500 च्या 14,600/- नोटा

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ......... वरील प्रमाणे .........

Unnatural / Accidental Death Case No., if any

पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील [illegible] नमूद तारीख वेळी व ठिकाणी यातील कॉलम क्र 07 मधील आरोपी लोकसेवक क्र 01 यांनी लोकसेवक असताना त्यांच्या पदाचा दुरुपयोग करून यातील तक्रारदार यांचे प्लॉट क्र 191-192 शहीद भगतसिंग नगर, जे.बी. नगर, येथील इमारतीचे वरील दोन मजले अवैध असलेबाबतची नोटीस देऊन त्यावर निष्कासन कारवाई न करण्याकरिता व सदर ठिकाणी नियोजित [illegible] बांधकामाबाबत मदत करणे करिता तसेच नियोजित प्लॉट क्र 193-194 येथील [illegible] प्रलंबित बांधकामाबाबत सहकार्य करणे करिता, असे सर्व मिळून रक्कम रु दोन कोटी इतक्या लाचेची मागणी करून त्यातील पहिला हप्ता म्हणून 75,00,000/- (पंच्याहत्तर लाख) इतकी लाचेची रक्कम स्वतः व इतरांकरिता स्विकारण्याचे मान्य केले सदरची रक्कम कॉलम क्र 07 मधील नमूद खाजगी इसम आरोपी क्र 02 व 03 यांचे मार्फतीने संगनमत करून स्विकारली म्हणून त्यांचे विरुध्द भ्र.प्र. अधिनियम 1988 कलम 7, 7अ अन्वये गुन्हा नोंद.

केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलीस निरीक्षक गणेश हिरासिंग पिंगुवाले

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, .........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ..... — ....., जिल्हा ..... — ....., राज्य ..... — .....

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................ Rank............... No............... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to................................................ (3) Transferred to P. S. ............................................ District.............................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

तक्रारदाराची सही व अंगठा Goldie Parshotam Sud

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name गणेश हिरासिंग पिंगुवाले

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ला. प्र. वि. मुंबई

Posting

Code No. of I. O. .............................................

1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..................

1. Date and time of submitted to the Court.

2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

hment to item 7 of **First Information Report**